# कमलिनी

काव्य २२६६



REFBK-0020366
REFBK-0020366

कवि-कमलाकर

काव्य संग्रह
वि.क्र. २०३६६
दि. ६।२।६५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २०३६६ वि: काव्य
क्रमांक २२६६ नोंद दि: ६।२।६५

# कमलिनी

( काव्यसंग्रह )

REFBK-0020366
REFBK-0020366

कमलाकर

कमलिनी प्रकाशन, भुसावळ.

प्रकाशक :
विजय गोपाळ फेगडे
कमलिनी प्रकाशन
४८९३, सहकार नगर
भुसावळ

*

© सौ. कमळ गोपाळ फेगडे

*

प्रथमावृत्ती
जून १९७४

*

लेखन काल :
२६ जानेवारी १९६६
ते
८ मार्च १९६६

*

मुखपृष्ठ व रेखाटन :
श्री. रत्नाकर महाजन

*

मुद्रक :
स. पां. जोशी
समर्थ प्रेस, ठाणें

माझ्या प्रिय पत्नीस

# कमलिनी

उत्पत्स्यते हि मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी
—भवभूति

कमलाकर

# एका थोर साहित्यिकाचा अभिप्राय

श्री कमलाकर काळे इंदापूरच्या कवितांची हस्तलिखित वाचून पाहिली. त्यांची प्रतिभा स्वतंत्र असून, रचना ही पुष्कळ अंशी लालित्यपूर्ण आहे. त्यांची विषयाची निवड ही आकर्ष-क आहे. काही रचनाविशेषांना मी त्यांस समक्ष सूचना केल्याच आहेत. त्यांनी आपला काव्यरचनेचा असाच व्यासंग चालू ठेवल्यास ते उत्तम दर्जाचे कवी होतील ह्याविषयी मला खात्री आहे.

३० जानेवारी, १९५८ प्रल्हाद केशव अत्रे

## स्वागत—

कवी कमलाकर यांच्या कवितांचा हा छोटा संग्रह वाचत असतांना पहिली गोष्ट कोणती जाणवत असेल तर भावना यथायोग्य शब्दात व्यक्त करण्याचे त्यांचे सामर्थ्य. भावनांचे वेगवेगळे पैलू त्या त्या भावनांना अनुकूल अशी शब्दरचना घेऊन प्रगट होतात. त्यामुळे भावनाविष्करण परिणामकारक होते. गीतरचना हाही त्यांच्या काव्याचा डोळ्यात भरण्या सारखा विशेष आहे. आजच्या मुक्त छंदाच्या युगात हा विशेष अधिकच उठून दिसतो.

त्यांच्या काव्यामधून आपणाला उत्कटपणे दर्शन होते ते त्यांच्या प्रेमभावनेचे. प्रीतीची भावना नानातऱ्हेने त्यांनी आळवली आहे—पण त्या सर्वांतून साफल्याचा सूर आहे. 'प्रेम हेच धरि रे सत्य मनी' अशी त्यांची प्रेमासंबंधीची भावना आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतून प्रेमाच्या सफलतेचे सूर अधिक प्रमाणात निघाले तर नवल नाही. स्वतःच्या पत्नीविषयीच्या भावना तर त्यांच्या मनाची कृतार्थता व्यक्त करणाऱ्या आहेत. 'मम रमणी' 'काव्य प्रेरणा' 'सखे तुझ्या दुरी' या त्यांच्या काव्यातून प्रगट होणाऱ्या भावना मोठ्या हृद्य आहेत. 'हे माझे घर' मधील भावही त्यांची घराविषयीची ओढ अतिशय चांगल्या रीतीने प्रगट करतात. 'कामिनी नार्दविते शृंगार' या मधील कल्पना विलासही मोठा रम्य आहे. 'मुग्धा' ही कविता मर्ढेकरांच्या 'फलाटदादा' या कवितेची आठवण करुन देते. पण या मधील 'फलाटदादा' हा प्रेमासाठी झुरणाऱ्या व्यक्तीचे प्रतीक आहे. प्रेमभावनेचे हे पैलू जरी एकरंगी असले तरी ते अतिशय हृद्य वाटतात.

प्रेमभावना रंगवतांना अन्तर्मुख झालेले कवि–मन भोवतालच्या समाजाकडे पाहतांना बहिर्मुख होऊ लागते व सामाजिक अन्याय, सामाजिक व आर्थिक विषमता याचे अत्यंत त्वेषाने चित्रण करू लागते. 'पोटाची भूक' 'गटार' 'हा मानव–तो मानव' या त्यांच्या कविता त्यांच्या बहिर्मुख वृत्तीची साक्ष देतील. या भावना त्यांनी ओजस्वी रीतीने रंगविल्या आहेत. 'पोटाची भूक' या मधील खालील ओळी पहा—

> पेटते जाळते खवळते आतडे
> संस्कृती सभ्यता काय ही त्यापुढे !
> कायदा बंध डर सर्वही बापुडे
> भूक जाळी जळे धर्मही धडधडा !

या साऱ्याच कवितेतून प्रगट झालेली ओजस्वी भाषा भुकेच्या पेटलेल्या डोंबाला साजेशीच आहे. 'गटार' 'हा मानव-तो मानव' यातील भावना अशा क्षुब्ध करणाऱ्या आहेत. 'ओंडका' व 'मोहोळ' या दोन प्रतीकात्मक कविताही कवीच्या प्रक्षोभाची साक्ष देतात. 'ओंडका' वाचताना तर कुसुमाग्रजांच्या 'माळाचे मनोगत' या कवितेची सतत आठवण होते.

त्यांच्या भावनेचा प्रक्षोभ असाच समर्थ शब्दात राजकीय भावना रंगवितांना प्रगट होतो. ' आज पेटला ज्वालामुखी ' ' वीर चालला ' 'भारतीय सैनिक ' या त्यांच्या तीन कविता पहाव्यात. रणगीताच्या कसोटीला त्या निश्चित उतरतील. ' आज पेटला ज्वालामुखी ' या काव्यात तर त्वेष शब्दा शब्दातून व्यक्त होतो असे वाटते. नामदार शास्त्रींबद्दल त्यांना वाटणारा असीम आदर ' गूळ आणि फुले व ' श्री. शास्त्रीजी ' या दोन कवितांतून प्रगट झाला आहे. ' अणुबॉंब ' बद्दल वाटणारी त्यांची चीडही त्यांच्या ' अणुबॅाब ' कवितेतून व्यक्त झाली आहे.

निसर्ग-वर्णन त्यांच्या काव्यातून फारसे येत नाही कारण त्यांच्या कवितेची बैठक अगदी वेगळी आहे. निसर्गाच्या दृश्यातून त्यांची चिंतनशील दृष्टी प्रगट होते. अनंताची ओढ लागलेल्या पृथ्वीसतीचे त्यांनी काढलेले चित्र, किंवा सागराशी एकरूप होण्यासाठी निघालेल्या नदीचे मनोगत हा निराळा दृष्टिकोन स्पष्ट करतात.

'पृथ्वीसतीचे वाण' ही कविता कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' ची आठवण करून देते. पण कुसुमाग्रजांची पृथ्वी सूर्यावर प्रेम करते आहे तर या कवीच्या पृथ्वीला अनंताची ओढ लागली आहे.

कवी कमलाकर यांच्या कवितेचे स्वरूप असे आहे. एकीकडे प्रणयाच्या व वात्सल्याच्या मुग्ध व कोमल भावनांचा आविष्कार तर दुसरीकडे सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनातील विसंगती व विषमता पाहून प्रक्षुब्ध झालेल्या भावनांचे तांडवनृत्य अशा दोन्ही भावना समर्थ रीतीने प्रगट करण्याला योग्य अशी शब्द संहिता—हे सर्व त्यांच्या काव्यातून आढळते. म्हणून त्यांच्या पुढील काव्याबद्दल मला आशा वाटते.

काव्याच्या क्षेत्रात प्रथमच संग्रहरूपाने पदार्पण करणाऱ्या कवी कमलाकरांचे मी स्वागत करतो व त्यांच्या पुढील कलाकृती अधिक भव्य व अधिक भावोत्कट होवोत अशी इच्छा प्रगट करतो.

दि. १२-१०-१९६७ म. ना. अदवंत

# मनोगत—

वाटलं होतं हे मनोगत कशाला? काय सांगायचे यातून? कशाबद्दल बोलायचे? माझ्या कवितांबद्दल मी काय लिहिणार? ते वाचक लिहितील. त्याचं मूल्यमापन किंवा रसग्रहण रसिक करतील. मी कोण कसा याबद्दल तसे लिहिण्याची आवश्यकता नाहीच. ते जाणल्याने काय होणार? कवीच्या नावा-वरून तर कोणी समालोचनात फरक करणार नाही! तसा कोणी करूही नये. म्हणून हे मनोगत लिहायचा विचारच नव्हता. पण माझे मित्र श्री. कमलाकर पांडे यांनी फारच आग्रह केल्याने हे मनोगत लिहावे लागले.

या मनोगतात मला फक्त आभार मानायचे आहेत. माझे मित्र व हित-चिंतकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करायची! त्यांनी ह्या प्रकाशनाबद्दल आग्रह धरला म्हणूनच हे प्रकाशन पार पडले. अन्यथा मला ह्या प्रकाशनात रस नव्हता, रुचि नव्हती व उत्साहही नव्हता! १९६६ साली लिहिलेल्या ह्या कविता १९७४ साली म्हणजे ८ वर्षांनी प्रकाशित होत आहेत! आणि त्याही अशा परिस्थितीत की तिच्याबद्दल बोलणे शब्दांच्या पलिकडे आहे.

जीवनातील आशा संपल्या आहेत, उत्साह थंडावला आहे आणि कुठेही चैतन्य दिसत नाही!

श्रेय नामावलीत प्रमुख नावे दोघांची. श्री. वि. स. खांडेकर व कै. सानेगुरुजी. माझ्यावर संपूर्ण भाव व विचार विश्वावरच त्यांचे ऋण आहे. ते व्यक्त कसे करणार?

महाराष्ट्राचे एक थोर साहित्यिक कै. आचार्य प्र. के. अत्रे यांनीही माझ्या या कविता वाचण्यासाठी उरळीकांचनला ते विश्रांतीसाठीं आले असतांनाही आपला बहुमोल वेळ दिला, एकेक कविता रसिकतेने वाचून मला

मार्गदर्शन केले व आपला अभिप्रायही लिहून दिला, या त्यांच्या उदारते-विषयीं मला फार कृतज्ञता वाटते.

प्रा. म. ना. अदवंत यांनी व्यक्तिशः माझ्याशी परिचय नसतानाही (आजही त्यांच्या समोर गेलो तर ते गो. ना. फेगडे म्हणून मला ओळखतील की नाही शंकाच आहे. कवि कमलाकर म्हणून मात्र ओळखतील.) अत्यंत आत्मीयतेने या प्रथम संग्रहाचे ' स्वागत ' केलें, त्यांचे हार्दिक आभार मानतो !

शिवाय खालील सर्व सुहृदांचा उल्लेख मला केलाच पाहिजे. माझ्या कविता रसिकतेने वाचून त्यांचे प्रथम कौतुक करणारे व त्या प्रकाशित होण्याची उत्सुकतेने वाट पाहाणारे माझे मित्र श्री. रा. वा. पाटील, प्रकाशनाचा आग्रह धरणारे व त्यात मनःपूर्वक रस घेणारे माझे ज्येष्ठ बंधू श्री. वा. ना. सारंग, प्रकाशनासंबंधी जिव्हाळ्याने उपयुक्त सूचना करणारे श्री. कृ. पा. पाटील या सर्वांचा मी ऋणी आहे.

तसेच ज्या मित्रांनी, सुहृदांनी, आप्तेष्टांनी मला प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत करून प्रोत्साहन दिले त्या सर्वांचा नामोल्लेख कसा करणार ? त्या सर्वांबद्दलची कृतज्ञता माझ्या हृदयात आहे, ती व्यक्त केल्यानेच कळणार असे थोडेच आहे ?

शेवटी हे पुस्तक आता ज्या स्वरुपात निघत आहे त्याचे संपूर्ण श्रेय श्री. कमलाकर पांडे यांचे आणि ज्यांच्यामुळे त्यांचे मित्रत्व लाभले व ज्यांनी या प्रकाशनाची सदिच्छेने सूचना केली ते माझे मित्र श्री. कमलाकर बळेल यांचे आहे. त्यांच्या ऋणातून मुक्त होणे नाही.

मुखपृष्ठावरील सुंदर चित्र श्री. रत्नाकर महाजन यांनी थोड्या अवधीत काढून दिले त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

**गो. ना. फेगडे**

# कमलिनी

कमलाकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
२०३६६ काव्य
२२६६ दाकाव्य

उंबऱ्यात ठेवि न तव चरणा
मी अशरण थांब तिथे मरणा
अजुनि रसरसे इथे आत्मबल
भीष्माचे बघ इथे मनोबल
अजुनि चळी या होणे निश्चळ
रे परत, प्रबळ जीवितेषणा

—कमलाकर

## अनुक्रमणिका --


| | | | |
|---|---|---|---|
| मम रमणी | १ | पृथ्वी-सतीचे वाण | ३० |
| काव्यप्रेरणा | २ | ती संध्या | ३३ |
| प्रेम | ३ | वर्षा | ३४ |
| कामिनी नादविते शृंगार | ४ | वेडे | ३६ |
| पोटाची भूक | ६ | वीर चालला | ३८ |
| सखे तुझ्या दुरी | ८ | ओंडका | ४० |
| मुग्धा | ९ | कृतघ्नता | ४३ |
| गूळ आणि फुले | १२ | गटार | ४४ |
| श्री. शास्त्रीजी | १५ | भूदान | ४९ |
| हे माझे घर | १७ | भारतीय सैनिक | ५० |
| आज पेटला ज्वालामुखी | १९ | एक स्पर्श | ५२ |
| आई तू ! | २३ | अश्रू | ५३ |
| मोहळ | २४ | हा मानव— तो मानव | ५४ |
| अणुबॉम्ब | २६ | | |
| ध्येय संगम | २८ | मी अशरण थांब तिथे मरणा | ५६ |

# मम रमणी

हे क्षण भरु दे थांब, कविते
हे क्षण भरु दे थांब

प्रशांत अवनी, सुशांत रजनी
धवल चन्द्रकर, सदनी शयनी
सन्निध निद्रित, ही मम रमणी
हे बघु दे सुखधाम शयनिचे
हे क्षण भरु दे थांब

तेजोमय हे प्रसन्न घरकुल
सुखशीतल नित स्नेहल अविरल
हिचे सत्त्व हे हिचेच गे बल
दर्शन हे अभिराम, घेउ दे
हे क्षण भरु दे थांब

प्रसन्न गृहिणी, प्रेमळ भगिनी
सुरत–कामिनी, वत्सल जननी
प्रियतमाच ही सखि विनोदिनी
ही मदीय विश्राम, पाहु दे
हे क्षण भरु दे थांब

हीच प्रेरणा, मूर्त काव्य मम
ही जीवन, ही आस स्फूर्ति मम
ही मंगलमय सुखरस अनुपम
क्षणैक हे रसपान करू दे,
हे क्षण भरु दे, थांब

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
........................ दि: ...काव्य
........................

# काव्यप्रेरणा

श्रद्धा प्रेम पवित्र मूर्ति जितुक्या संपूजिल्या मी हृदी
त्यांची राखच मात्र सन्मुख! अशी आली अवस्था जधी
नैराश्यी बहु सापडे, तळमळे, हा जीव जेव्हा प्रिये,
आली तूच करात घेउनि सखी, चैतन्यदीपा स्वये

अंधारी घनदाट मार्ग दिसला, तूफान ते थांबले
आशेचे मम अंतरात सहसा गे दीप तू लाविले
चैतन्या नव, जीवनास नव, नी नाविन्य पंथासही
देऊनी ऋण तू अनंत दिधले, ठेवी हृदी सर्वेही

आयुष्यी निज वैभवी उभविले हे जे दिसे मंदिर
त्याचे मूळ नि मूर्ति तूच रमणी, तू प्रेरणा सुंदर
प्रीती तू विनया सुशांत गृहिणी, भार्याच तू सोज्वळा
माझे काव्यच मूर्तिमंत सखये, तू प्राण तू चित्कळा

तू आहेस म्हणून जीविति सखे, सानंद मी रंगलो
तू आहेस म्हणून काव्यमधुच्या दानात आनंदलो.

# प्रेम

प्रेम हेच धरि रे सत्य मनी
रे तयास स्मर तू क्षणोक्षणी
प्रेम सुधारसपात्रि वाहते
नाहते दिव्य ती संजिवनी

भगतसिंग फासास कवळितो
प्रेषित येशू क्रुसास खिळतो
गोळि शिरे ‘ राम ’ ध्वनि उठतो
शांत हासऱ्या बापूवदनी ॥ प्रेम ॥

प्रेम मिळे, मनफूल उमलले
प्रेम स्फुरे, प्रियतममुख फुलले
प्रेम खुले, वात्सल्य विलसले
प्रेम बांधते विश्व बंधनी ॥ प्रेम ॥

प्रेम विरे भ्रमर फुला विसरे
कुमुदिनिमधि चंद्रकर न विहरे
कुठे हर्षसुख, प्रेम जर नुरे ?
नंदनास निर्मी ते भुवनी ॥ प्रेम ॥

अबला करि बलि, भीता निर्भय
दुष्टा सहृदय, मृता प्राणमय
कंटकपथि अन् फुलां फुलविते
वेदना सुशीता होय क्षणी ॥ प्रेम ॥

पालवात निज दीप घेउनी
आशा ये मधु हसत जीवनी
करि न कल्पना, अनुभूती घे
उघडती अनुभवी दिव्य खनी ॥ प्रेम ॥

# कामिनी नादविते शृंगार

कामिनी नादविते शृंगार
अंगांगावरि स्वये लेउनी
प्रफुल्लतालंकार

स्वर्गीची अप्सरा उतरली
वा कमला ही नीलजलातलि
स्वप्नभूमि नयनात बिंबली
होउनिया साकार, नादविते शृंगार

अधरपुष्पि घेऊनि सुधारस
स्वरोल्लास कंकणात लालस
स्पर्शातुनि गतिकिरण छेडिती
तेजाचे झंकार, नादविते शृंगार

नवोन्मेष आंदोलति नेत्री
विलसे चपला गात्री गात्री
मेघाप्रत ये गमे दामिनी
आळवीत शृंगार, नादविते शृंगार



प्रेम काम निज ज्योती नयनी
मदिरामृत कुंभात, मोहिनी
तनूमनाच्या अणुरेणूंना
दे नव साक्षात्कार, नादविते शृंगार

गंधपुष्प वा रती धुंद ये
चंद्रिकाच की स्वप्नपरी ये
स्पंदन संवेदन नवतीचे
चेतवि वारंवार, नादविते शृंगार

सरे दूरता एकाकीपण
आलिंगनि हो अति सुखपीडन
मीलनि क्षणकण पूर्ण निमाले
आर उरे ना पार, नादविते शृंगार

## पोटाची भूक

तडतडे कडकडे कुरतडी आतडे
भूकवह्नी जळे पोटि पाडी तडे
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

संप्रती पेटला क्षुब्ध दावानळ
उठति ज्वाळा सहस्रावधी चंचळ
वृक्षवेली तृणे भस्मितो डोंगर
श्वापदे पक्षि जाळी बळी तडतडा
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

पेटते जाळते खवळते आतडे
संस्कृती सभ्यता काय ही त्यापुढे ?
कायदा बंध डर सर्वही बापुडे
भूक जाळी जळे धर्मही धडधडा !
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

लोक-सम्राट जे धर्म-मार्तंड जे
अन्नसंपन्न जे संपदाधुंद जे
श्रीसह क्रीडती स्वार्थि बेहोश जे
ते पदी याचिया लोळतिल गडबडा
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

दीन दुबळा न तो शुष्क किडका न तो
रे जया पोटि क्षुद्वह्नि हा पेटतो
संघ त्याचा अनिर्बंध उन्मत्त तो
पाडि फोडी सुरक्षा-तटा धडधडा
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

खाद्य अर्पूनिया अग्नि हा शांतवा
अन्नबळि देउनी मेटवा तांडवा
रौद्रनृत्यास या क्रुद्ध तप्तार्णवा
तुष्टि तृप्तीस द्या संपवा आपदा
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

तू म्हणोनी क्षणी जागृती घे जगा,
अंतिच्या रक्त रुद्राक्षज्वाळा जिभा
लळलळा ग्रासती झोंबती ना, उगा
शांतवी तोवरी तप्त याची क्षुधा
डोंब उसळे गिळी मूळ डोके धडा

अनुक्रम 20366 वि: काव्य
क्र. 2266 नोंद दि: 6/12/05



# सखे, तुझ्या दुरी

तुझिया सन्निधी
रूप विसरलो
तुझिया सन्निधी
नाम विसरलो
तुझिया सन्निधी
नाद विसरलो
तुझिया सन्निधी
भाव विसरलो
तुझिया सन्निधी
कृति विसरलो
तुझिया सन्निधी
सारे समरस

तुझिया रूपात
रूपाच्या मोहात
तुझिया नामात
नामाच्या मोहात
तुझिया नादात
नादाच्या मोहात
तुझिया भावात
भावाच्या मोहात
तुझिया कृतीत
कृतीच्या मोहात
ऐक्य तुझे माझे
तुझे आणि माझे

◇ ◇

सखे तुझ्या दूर
सभोती सर्वत्र
सखे तुझ्या दूर
पारायणे होती
सखे तुझ्या दूर
कानात घुमती
सखे तुझ्या दूर
हिंदोळती, देती
सखे तुझ्या दूर
आंदोलती सदा
सखे तुझ्या दूर
अस्तित्व जाणवे

आता तुझी रूपे
दिसती अमूपे
तुझिया नामाची
वारंवार साची
येथे तुझे नाद
आता असंख्यात
तुझे रस भाव
स्मृतींना अपूर्व
तुझ्या कृती सर्व
मनाचा पालव
मिटती ना नयन
तुझे क्षणो क्षण

# मुग्धा

फलाटदादा वदे स्वताशी
कधी पुन्हा मी पाहिन तिजशी ?
त्याच्या मानस–नेत्रि रंगले
चित्र तेच जे कधी पाहिले

नित्यापरि मी पडलो होतो
तेच तेच ते स्पर्श अनुभवी
अननुभूत ते नव संवेदन
न मिळे कोठे अपार वैभवी !

आतुरलेला आसुसलेला
आत्मा होता काही शोधत
नवलपूर्ण कधि तेजकिरण तो
मिळेल होती आशा तिष्ठत

अभिनव तत्क्षणि जाणिव झाली
जणू अचानक वीज खेळली
नवोन्मेष तो नवोद्रेक तो
अनुभवून ही तनु थरारली

युगायुगाचे इच्छित आजी
फुलले जीवित क्षणात फळले
गमे लाभले तेच आजवरि
होते ज्याचे वेड लागले

आणि पाहिले वरी नवल ते
कोमल पद जणु कमलफुले ती
मंद गतीने मृदु स्पर्शने
चालत होती अंगावरती

तन्वंगी कुणि कमलिनीच ती
भावसुगंधा षोडश बाला
गुलाब कलिका गुंफित लेउनि
शाल वेढली नाजुक तनुला

मोहुनि आल्या गुलाबकलिका
मंत्रमुग्ध अन् इथे बैसल्या
पाहत ही जणु सरस चंद्रिका
फुलण्याचेही भान विसरल्या

तेजांकित मुख–किरण घेउनी
कर्णफुले आनंदे हसती
कवळुनि कुंतल स्निग्ध रेशमी
फुलवेण्यांचे गंध उमलती

विनयांकित मधु सलज्ज स्मित अन्
भावपूर्ण ते डोळे सोज्वळ
कर्णमधुर वच मूर्तरूपे ही
हृद्भावांची सहज सुनिर्मल

विमलांतर–वीणेने निर्मित
दाडिमदाण्यातुनि रस सिंचित
नाजुक अधरामृति भिजलेले
मंद मधुर स्वर आले नादत

नयनभाव, स्मित हाव वच, कृति
सहज सरल अव्याज मनोहर
षोडश मूर्ती पूर्ण निरागस
आली, गेली, सुशील, सुंदर,

तेच चित्र दिसले रेखांकित
क्षणात परि ते विलया गेले
आणि वदे तो पुन्हा स्वताशी
दाबुनि काहुर आत आतले

‘ क्षणे चालली दिवस चालले
वर्षे गेली तिला पाहुनी
चित्त लाखदा प्रश्न विचारी
मुग्धा ती येइल का फिरुनी ! ’

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
20366
2266



# गूळ आणि फुले

[ दि. ११–१–६६ रोजी श्री. शास्त्रीजी आणि श्री. सरहद्द गांधी यांची भेट व्हावयाची होती. श्री. सरहद्द गांधी गूळ आणि फुले यांची भेट घेऊन काबूलच्या वकिलातीत आले. तेथे शास्त्रीजी येण्याऐवजी त्यांच्या मृत्यूचीच बातमी आली ! त्यांनी गूळ व फुले त्यांना वाहिली जावी म्हणून दिल्लीला पाठवून दिली. ]

एक बंधनात दूसरा स्वतंत्र
विहरे सर्वत्र स्वेच्छया तो
एक शांतिमित्र दुजा शांतिदूत
दोघे राष्ट्रभक्त विश्व प्रेमी
परस्परी ऐक्य परस्परी सख्य
उत्कट उत्सुक भेटावया
'माझिया जातीच्या माझिया सुहृदा
केधवा एकदा भेटेन मी
असा येई हृदी प्रेमाचा आवेग
क्षण झाले युग उभयांस

भेटीचा सन्निध आला पर्वकाल
वाटे उषःकाल केव्हा होई
एकाचे मानसी दाटे हुरहूर
अधीर अस्थिर झाला बहू
दुजा कार्यमग्न शांति संपादनी
मित्राते मधुनी स्मरे क्षणी
'उद्या' पल्लवीत रोमांच शरीरी
स्मृति गंधांतरी पुष्पे झाल्या

एकाचे मानसी	आशा पालवल्या
स्मृति तरंगल्या	प्रसन्नशा
'मनाच्चिया कोशी	घेऊनी मित्रास
त्याशी हितगूज	करीन मी
माझा मायदेश	माझा तो प्राणेश
त्याचा बंध मोक्ष	होईल ना ?
कितीक युगांचे	स्वप्न हे साकार
व्हावया आधार	मिळेल ना ?
मित्राते भेटेन	मित्र आलिंगनी
आवडीची धनी	फेडीन मी '

आला उषःकाल	त्याची चित्त वेल
हर्ष परिमले	भारावली
प्रफुल्ल प्रसन्न	उत्कंठित मन
सोनियाचा क्षण	आज आला
सद्गद होऊन	देवासी वदला
'दया तुझी 'लाला'	पाठविसी '
गूळ आणि फुले	भेट मनोहर
घेऊनी सत्वर	सिद्ध झाला
सुगंधी प्रेमोष्ण	सुंदर, मधुर
भेट बाह्यांतर	परिमळे

परन्तु !
परन्तु तो क्षण !!
परन्तु तो क्षण	कसे वर्णू त्यास ?
तिमिरे आकाश	व्यापियेले !
वाट पाहे वृक्ष	मेघाची ज्या क्षणी
विजेच्या पतनी	भस्म झाला !

मित्राच्या मृत्यूची    संदेश – विद्युत
येऊनी क्षणात    कोसळली !

पठाणी अंतर    पहाडाचे मन
दग्ध झाले, क्षण    सुखाशांचे
गूळ आणि फुले    मित्राला वाहिली
तशी श्रद्धांजली    आसवांची !

## श्री. शास्त्रीजी

तव ते जीवन होते जीवन
निष्कलंक निर्मल शुभ अनुपम
सतेज परि शीतल शशांककर
प्रस्तरभेदी जल, तरि कोमल
बालमित्रकर मध्यरवीकर
ज्यांस मिळे तव हृदी मित्रपण

गंगेसम उगमात स्वल्पता
समुद्रसंगमि परी भव्यता
सरल असुनि कुटिलावर सत्ता
पौरुषात विनयाचे मीपण

अणुसम लघुत्व धरुनी गुरुता
स्थिर केली सम्भ्रान्त शांतता
अधन जरी त्यागात सधनता
अमुचा म्हणती कोटि कोटि जन

जनतेमधला जनतेचा तू
जनतेसाठी, नुरला किन्तू
जनतेचा आत्मीय, मान तू
दुरी न जनता, ती तुज दूर न

या जगताचा त्रस्त युगाचा
मानवतेचा सामान्यांचा
ध्रुवतारा तू पथ-भ्रष्टांचा
अचल अमिट अन् अक्षय निर्मम

स्वांतरिचे मधु ओतुन मार्दव
ताप शमविले प्रपंच–संभव
निष्ठातुलि जी अणुही नच लव
छायेपरि तव अर्धांगिनिसम

संघर्षातुनि उगवे शांती
मुकुट चढे श्रममंदिरि अंती
तो मृत्युच, तोषुनि निज हाती
दिले जयाने चिरंजीवपण
तव ते जीवन होते जीवन

## हे माझे घर

सीमित सुंदर हे माझे घर
जिथे दरवळे अंतर-परिमळ
उत्साहाची देइ शिदोरी
कामावरि निघता बाहेरी
श्रान्त परतता अन् माघारी
हरते श्रम जणु बागच शीतल
हे माझे घर हे माझे घर

संघर्षाच्या या बाजारी
कढे जळे मन हे कल्लोळी
तप्त वाळुरणि फसव्या मृगजळि
मिळे गार हे हरित वनस्थल
हे माझे घर हे माझे घर


त्रिशूल तापांचे खर टोचति
चिंतेचे कंटकहि बोचती
कष्टे तनुमन त्रस्त हो अती
व्यथा शमवि तइ जणु वत्सल कर
हे माझे घर हे माझे घर

कुलदीपच ते बाळ विहरते
प्रशांत स्थिरता येथ नांदते
प्रसन्न या गृहसरी शोभते
कमलिनीपरी गृहिणी सोज्वळ
हे माझे घर हे माझे घर

झुरणे कुढणे जळणे न इथे
भांडण नच, मन कार्यी रमते
अखंड वासहि संतोषाते
किमया ही गृहिणीची केवळ
हे माझे घर हे माझे घर

तेच तेच अनुदिनि, परि सुंदर
वाटे का हे हृद्य मनोहर ?
आत्म्याच्या की प्रेमबंधनी
इथे गुंतले हृदय–भाव–स्वर ?
हे माझे घर हे माझे घर

हे माझे घर हे माझे घर
ओढ जयाची अति अनिवार
ताज राजगृह वा सुरमंदिर
नको, त्याहुनी प्रिय माझे घर
हे माझे घर हे माझे घर



# आज पेटला ज्वालामुखी

आज हा पेटला ज्वालामुखी
आज पेटला ज्वालामुखी
असंतुष्ट समाज–पुरुषच जणू
आतल्या आत धुमसत होता आजवर
होता तडतडत
होता धडधडत
धुमारत, पेटत, जळत आत आत
चिडत, संतापत
कढत वाफाळत होते आतले द्रव्य
होती पडत भगदाडे
आणि प्रचण्ड खड्डे
चक्काचूर झाला हृदयाच्या कप्प्यांचा
नाजूक भागांचा
वज्रासमान अभेद्य तत्वांचा
हृदयाशी जोपासलेल्या सत्त्वाचा
युगायुगांपासून सांभाळलेली
होती अंतराच्या मंजूषेत जपून ठेवलेली
ती सर्व पेटली आज–
झाला त्यांचा अग्नीच
अन् – लाव्हा, निखारे, ज्वाळा
विषारी वायूंच्या भडकल्या लाटा
आणि निघू लागल्या बाहेर

आज पेटला ज्वालामुखी
उघडला विक्राळ जबडा

जणू काळच साक्षात्
की लक्ष ज्वाळांच्या जिभा परजून
सुटले अण्वस्त्र हे!
मातले घोर थैमान
क्रोध संताप चीड, कढ
साऱ्यांचा सैतान निघाला बाहेर
भक्ष्य! भक्ष्य!!
गर्जना करीत वारंवार!
की हा समाज–पुरुषाचा असंतोष
'बळी बळी' म्हणून पुकारत आहे?
वा मरणाची निश्चिती कळताच
बेफाम झालेले
भेकडांचे परिवर्तित भ्याडपण?
त्याचेच दर्शन का हे?
त्याचेच दर्शन?

आज पेटला ज्वालामुखी
असंतोषाची आग ओकतो आहे.
फरफरत आहेत विषारी फवारे
सारा आसमन्त विखारला आहे
अजस्र पाषाण उडताहेत वर
आपटताहेत खाली
ठेचताहेत कोमल कठिणांना
षंढांना पुरुषांना
छोट्यांना मोठ्यांना
क्षया अक्षयाला
सुडाच्या आसुडांचे फटकारेच ते
ही आग? भीषण दुर्दम!

हा आगीचा लोळ ! लाव्हा !
गोठलेल्या आंतर्भावांचा
प्रवाहित रस ! लाव्हा रस !
विषारी क्षुब्ध काळ भुजंगच
ओघळत आहे !
घमेंडीत चिरडतो आहे सर्वांना
काय त्याच्यापुढे मातब्बरी कोणाची?
गवत, माती, खडक,
साऱ्यांची होत आहे आग आग !
याच्या क्षोभाचा भूकंपच हा !
सर्व त्यापुढे सारखे, जसा मृत्यूच !
नाही जात पहात ना पात !
ना धर्म न अधर्म
न न्याय अन्याय !
चांगले नाही ! वाईट नाही !
सर्वच अग्नये स्वाहा !

आज पेटला ज्वालामुखी
आग उलंडतो आहे !
लाव्हा ओकतो आहे !
अक्राळ विक्राळ मुखातून
फत्तर निखारे, विषोष्ण वायू
फेकतो आहे
पण—
स्वतःच्याच अंगांगावर !
स्वतःचाच देह भाजून घेत आहे !
जणु स्वरूपाला विटला आहे
कंटाळला आहे.

त्याच्यावरच संतापला आहे !
हे जागृतीत तांडव चालू आहे ?
की बळ, आत्मशक्ति तपश्चर्या
यांची अभिव्यक्ति ही ?
हा पुन्हा सुप्त होणार ? सुप्त होणार ?
मग—
' स्वतःलाच जाळण्यासाठी
झालास तू जागृत ?
याचा अर्थ काय ?
काय आहे याचा अर्थ ? '



# आई तू !

जन्मूनी भवितव्यहीन पडले होते कुठे रोपटे !
सौभाग्ये तव सिंचने टवटवी ये, त्यास संजीवन.
चैतन्यास दिले नवीन रुपडे लाभे बहू गोमटे
जीवोल्लास तरारला, उसळला तूझेच हे गे ऋण

स्वर्गीया अतिवत्सला हृदयिची तू वर्षली माधुरी
पर्णेही रसयुक्त ही विनटली देही जशा भावना
अंगी मोहरले शुभंकर असे संस्कार बाह्यांतरी—
उत्साहे नवजीवनौघ उसळे, जागे नवी चेतना

आता पुष्पफळी सुवैभवदली समृद्धि नांदे इथे
आली नम्र पवित्र मूक तुझिया यज्ञास गे सांगता
तूझ्या सदृश वत्सला सुविमला सौहार्दमूर्ती कुठे?
नाही स्तन्य दिले न जन्महि, परी मातृत्व पावे स्वता

प्रेम त्याग उदात्ततेत तुझिया, सापत्नतेच्या खुणा
भंगूनी जननीहुनी मिळविली तू श्रेष्ठ गे वंदना

# मोहळ

वडाचा तो वृक्ष पाहूनी विशाल
आणि हेरुनिया अन्तराल स्थल
उचित निवास करावया वास
गाठावी एकादी शाखा अनायास
होता आसमंत गंधाने भरीत
स्थान हेच इष्ट जाहले निश्चित
करिता नेत्याने सर्वांना इशारा
कामास जहाला प्रारंभ भरारा
झाली उभारणी खपले सहस्र
शाखेच्या डहाळी वसले नगर

किती तो प्रचंड कर्मयोगी ध्यास
पाहाता रोधिला अचानक श्वास
चिमुकल्या पंखी योजनांचा भार
सहज पेलती केवढे ते बल !
मागती पुढती वरती नि खाली
दिशांची मैदाने सारी निरिक्षिली
वेचला अखंड एक एक क्षण
साठविला मधू एक एक कण
खरा श्रम धर्म खरा सहकार
उभविले, केले समृद्ध नगर

तेथूनिया नित्य उठताती नाद
निनादित होती नादी पडसाद
एक एक कोश फुलतसे गाता
संस्कृतीची उच्च सभ्यतेची गाथा

' माझ्या या हृदयी मधाचा तो बिंदू
प्रेमाचा श्रमाचा एक एक सिंधू
कोशाची निर्मिती सांघिक रचना
कला ही महान मिळे न उपमा
अंतरीचा रस ओतूनी भावांचा
एक एक बिंदू रचिला येथचा
अंतरिच्या कळा बुद्धीच्या सुकळा
योजूनी रूपासी आणिले मोहळा '

चक्राकार गती पंखांना देऊन
गात तालावरी करून नर्तन
हर्षे अभिमाने वदे मधमाशी
आपुल्याच नादी गुंगत स्वतःशी
' बहिणी बहिणी– आम्ही सर्व एक
ऐक्यात राहतो शांत आणि नेक
दुजांचा अपहार इतरांचा दावा
नलगे करणे कुणाचाही हेवा '
अंतरीचे भाव बाहेरी फेकत
सुख संतोषाचे स्वर निनादत
उडाली चालली वेगात निघाली
पुन्हा श्रमधर्मी गुंते मधु–कळी

काळीकुट्ट रात्र भीषण तो काळ
वेढली कांबळी अग्निध्वजा लाल
आला अचानक स्वार्थाच्या जाळाने
उध्वस्त ते केले नगर मर्दाने ! !

## अणुबॉम्ब

दुष्ट भस्मासुरा, क्षुब्ध ज्वालामुखा
पेटसी स्फोटका, ग्राससी या जगा
धुंदि झाडू, रगडु चक्रि तुज दुर्मदा

तप्त चंडांशु हस्तामधी घेउनी
हाणिसी भूवरी जाळिसी ओकुनी
प्रलयघन-संघसम गर्जसी माजुनी
फोडिसी अंबरा अन् दिशांच्या तटा
धुंदि झाडू, रगडु चक्रि तुज दुर्मदा

भेदिसी प्राण-भू लक्ष-ज्वाला शरे
तू कृतान्ततही निर्मिसी कापरे
अचर विश्वातही भरिसि आतंक रे
कोण तिष्ठे खडा तुजपुढे उद्धटा ?
धुंदि झाडू, रगडु चक्रि तुज दुर्मदा

जल्पसी, 'भ्याड सारे तुम्ही दुर्बळ
का गिळू पाहता व्यर्थ सूर्यानळ ?'
वामने ठेचिले ना बळीचे बळ ?
हन्त ! तुज ना कळे, गर्वि शक्ती वृथा
धुंदि झाडू, रगडु चक्रि तुज दुर्मदा

पूर्वजन्मी तुला निर्मिले, मर्दिले
रे सुरांनीच ते आठवी तू त्वरे
जाण तूझा पुनर्जन्म मृत्यूहि रे
या मनुष्यांकुशी ध्यानि घे तू मुदा
धुंदि झाडू, रगडु चक्रि तुज दुर्मदा

'त्राहि' म्हणता सुरांनी नगांलागुन
पूर्वि दुष्यंत गेला क्षणी धावुन
इंद्रवज्रासही लाभले रक्षण
        घणघणे कीर्ति–डंका असा सर्वदा
        धुंदि झाड्डू, रगड्डु चक्रि तुज दुर्मदा

दुष्ट स्वार्थी सडे, अन्य विभवे जळे
क्रूर, ना मानवी, वृत्ति सत्ताबळे
निर्मिते, पोसते, संगि तुजशी मिळे
        मूळ ती वृत्ति ठेचू अम्ही ठसठसा
        धुंदि झाड्डू, रगड्डु चक्रि तुज दुर्मदा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# ध्येय संगम

कृतार्थ मी झाले
आज तुला भेटले ॥ धृ ॥
एकच होते लक्ष्य जीवनी
पूजियले जे नित्य मन्मनी
तुझ्यात विरणे तुझ्या संगमी
अंति तुला मिळले

गिरिअंकी खेळता नाचता
अस्फुट ध्वनि तव कर्णी येता
विसरलेच तव ध्यानी रमता
का न कधी कळले

लाड पित्याचे कौतुक दुर्मिळ
वृक्ष–लतांची संगति प्रेमळ
सोडुनिया तुजसाठी केवळ
धावुनि येइ बळे

मार्गी पडले, रडले, सुकले
विव्हळले, आपटले, अडले
पत्थर डोंगर यांशी भिडले
विजय परी तुजमुळे

मुग्ध राहिले कुठे मुग्धपणि
कुठे युवतिच्या हसले स्वप्नी
चिंतित कोठे बसले ध्यानी
हृदयी व्याकुळले

शहरे गांवे किती टाकली !
वृत्ति पुजेच्या बंधि न रुतली
रानदऱ्यांची भीति न उरली
तुझ्याच ध्यासामुळे

रात्रंदिन तव मीलनस्वप्नी
गुंगत रंगत अंतःकरणी
सर्वस्व तुला कधीच अर्पुनि
तुझी बनुनि आले

जीवनबिंदू क्षणाक्षणाला
अर्घ्यरुपे तुज अर्पुन केला
अट्टहास किति, हे न जिवाला
कधिही जाणवले

आल्या मिळल्या मधे मैत्रिणी
त्यांच्याशी हितगूज करोनी
खेचुनि त्यांना ऐक्य बंधनी
विजयी मी झाले

लाभलासि कृतकृत्य जाहले
तुझ्यात सारे सत्त्व मिळाले
प्रेम ध्येय आनंद मिळाले
जीवन हे फळले

अता तुझे बाहुबंध शांती
कळा मिठीच्या ही विश्रांती
तुझ्या मीलनी अंतिम तृप्ती
मूर्तपाश गळले

# पृथ्वी–सतीचे वाण

तुला हे अनन्ता, तुला ध्येय–देवा,
तुला भेटण्या चित्त आसावते
तुझ्याशी मिळावे तुला आवळावे
तनू मानसी हेच हेलावते
परी दूर तू लुप्त शून्यात नीला,
कसा येशि हाता, कधी भेट रे?
तुझ्या मीलनाला समुत्सूक नेत्री
पहा सुप्रिया, प्राण हे साठले!

इथे शृंखली बांधिले, बंदि केले
मला कोंडिले सूर्य–सत्ताधिशे
सुदिव्यत्व सामर्थ्य साहे न त्यासी
तुझी एकनिष्ठा मला देतसे
कळे ना कधी घातली पायि बेडी
पडे होउनी येथ कक्षा-भ्रमी
निशा वासरांच्या पहाऱ्यात तिष्ठे
ऋतूबंध चक्रात हिंडे श्रमी

कधी येथुनी मुक्ति? कारागृही या
असंख्यात कल्पावरी राहणे!
मदोन्मत्त हा धुंद मार्तंड राजा
तया अंकुशी स्वत्व सांभाळणे!
तयाच्या वशी मी रमावे म्हणूनी
किती आर्जवे तो करी ताडन!
किती मोह दावी किती यत्न त्याचे
छलासी करी केवढ्या भीषण!

परंतु सती मी पुजारीण तूझी
कशी निर्मला साहु सत्त्वच्युती ?
तुझी नील–देवा, तुझी श्याम नाथा,
सबाह्यांतरी वेढिली सुस्मृती
तुझा सर्वदा ध्यास नी भास देई
मला शक्ति नी स्वत्व ते सत्त्वही
जयाने इथे राखिली लाज माझी
तशी आजही सुस्थिता मूर्त ही

कधी जाळतो सूर्यसम्राट देहा
कधी आवरूनी करां आपुल्या
हिमे झोंबतो, सैन्यसंघा घनांच्या
कधी पाठवी शक्तिने माजल्या
किती साहते तांडवा मत्त त्यांच्या
अणी विप्लवा धुंद अंगावर
हृदी निश्चळा निष्प्रभा एकनिष्ठा
म्हणूनी जया मी व्रती अक्षर

कधी आसुडा तप्त वा थंड ओढी
विजेचे कधी घोर ते चाबुक
कधी तापलेल्या शलाका तयाच्या
बळे डागती, काळवंडे मुख
कधी तोच बेभान होऊन क्रोधे,
अमर्याद निर्मी इथे वादळे
चिडे झोडपे, भीत भावांश माझा
व्यथेने उले, व्याकुळे, विव्हळे

कधी रश्मिदूता इथे पाठवीतो
सुशीतोष्णरम्यां, तपा भंगण्या
कधी पाहण्या इच्छितो मोहपाशी
मला, सत्त्व माझे कधी लुटण्या
कधी सप्तवर्णांकिता कार्मुकांचे
स्वऐश्वर्य दावी विपन्ना मला
स्वदासा कधी पाठवी लाळ–घोट्या
सुधांशूस जो झेलितो थुंकिला

परी चिंतनी अन् निदिध्यासि तूझ्या
तुझ्या केंद्रि झेपाविती मत्क्षण
सुनीला, तुझ्या स्वप्नि रंगून प्रेया,
तुझ्यासाठि साहे व्यथा दारुण
कुणा वाटले तू जरी सत्य नाही
जरी प्राप्य नाहीस तू निर्मला,
कुणा भास, भ्रान्ती कुणा वेड वाटो
परी जाणवे 'सत्य तू' हे मला

कळे की तुझी प्राप्ति दुर्लभ्य नाथा,
तरी हेहि अप्राप्य तू ना मला
कधीही तरी सत्त्व देऊन माते
नको भेट तूझी, नको चित्कळा
युगांच्या शतांनी जरी मोजणे ही
वियुक्ती तरी घे न सत्त्वच्युती
मला निश्चिती, निश्चयाभंग माझा
तनूभंग होता तुझी रे युती

## ती संध्या

वृक्ष नव्हेतच काळ्या छाया
संध्येचे कढ हृदयामधले !
नभात एकच आशा तारा
दीप कुठे ते यौवनातले ?

थोडी उरली प्राण—लालिमा
पश्चिम—गिरिच्या क्षितिजावरती
संध्येची उरि निःश्वसिते ही
मरण-तमाच्या डोहावरती

नदी वाहते शांत एकटी
मोजि तिचे जल एक एक क्षण
खांब पुलाचे मूक दाबती
आत हुन्दके अपुले भीषण

विहग बिचारे दडून आतच
धडधडता कानोसा घेती
इथे कुणाची स्मशानात अन्
चिता धगधगे जाळी तनुमन !



# वर्षा

वर्षे, धरणीवर येसी
दिव्यांशा तव उरी धरोनी
वरतुनि अवतरसी

तीव्र तपे जाळल्या, पोळल्या
झडल्या सुकल्या जगत्पाकळ्या
करुणेचे संजीवन सिंचुनि पुनरपि पुष्पविसी

अदय ग्रीष्म ! शोषिले भावजळ
आणि कढविले सारे भूतळ
कढत बाष्प ते पिऊन पचवुन पय जगता देसी

काळे कच तव करुन मोकळे
झाकळून मुखमण्डळ अपुले
क्षोभ अनावर होउनि भूवर तांडवास करिसी

क्रोधे जइ तव पदर सळसळे
प्रचंड उठती जगी वादळे
धार-खड्ग कोसळे, गर्जसी वीजरूप बनसी

तदा दुजी तांडव-रुद्राणी
छेडिसि वा धुंद युद्ध-रागिणी
सागरात अन्याय भ्याडपण अमुचे लोपविसी

उदार तूझे पयः कलशघन
वात्सल्याचे अनुपम वितरण
चराचरावर करिती, देती जीवन सर्वांसी

की प्रेमे दाटताच तव उर
पयोधरांना फुटती पाझर
तव जग तान्हे पिऊन खेळे न्हाउन तृप्तिरसी

छळसत्री की ग्रीष्मबळीच्या
व्याकुळलेल्या चराचराच्या
व्यथीत आर्ता अश्रुरूप तव कोमलता स्रवसी

विरल जलसरी—वसन लेउनी
इंद्रधनूचा गजरा माळुनि
कांतेसम मधु हसऱ्या नयनी वाट कधी बघसी

मुलाफुलांनी हसल्या फुलल्या
पानफुलांनी भरुनि लहडल्या
अनंत धनराशी या भूवर गृहलक्ष्मी, लुटसी

करूणाश्रूंचे शुभ जलसंचय
संजीवक तव वत्सलतापय
प्रेमरूप पदचिन्ह मागुती ठेवुनि तू जासी



# वेडे

'वेड्याचे घर उन्हात' म्हणता ?
त्याच घरांतुन, त्या छायेतुन वसावयाचे
सर्वहि जगता

हे वेडे उभवितात हे घर
संसृति ज्वालेचे साहूनि शर
'छाया घरही जगतासाठी' मंत्र आळवित जगता मरता

यज्ञाहुति बनुनि – ज्वाळांनी
रूढींचे गळफास जाळुनी
देती जगता मुक्त पंख ही नव संजीवक नभ-निर्भयता

गहन तमातुन, घन क्षोभातुन
वृष्टि वादळी संघर्षांतुन
स्नेह सांत्वना दीप राखुनी अभय देति आक्रमिती सुपथा

तृणसम त्यागुनि पुष्पशेज धरि
आर्तांचे स्वर स्पर्शताच उरि
समर्पणातचि, जळती, गळती, तिळतिळ पळपळ तुटता तुटता

अज्ञाताचे कल्पवृक्ष–फळ
अर्पिण्यास मानवते केवळ
अटूट साहस-दोर बांधती फिरति न मागे चढता पडता

निष्ठा धरिल्या, हृदी पूजिल्या
तनु पडता झडताहि रक्षिल्या
'पिसे लागले' डसती सारे  तरी झगडती खंत न करिता

भोति तप्त रण, अमित क्षार जल
'पाणि पाणि' क्रंदते चराचर
वक्षघटीचे पय पाजुनि त्यां सतृष्ण भरती हसता हसता

निर्मूलन करण्या दुष्टांचे
विकार होमिति सर्व स्वताचे
जगकल्याणा होति पुष्पसम तशीच धरिती कठिण वज्रता

दान तयांचे—हे घर छाया
त्याविण जीवन अमुचे वाया
घाम गाळुनी रक्त शिंपुनी जागविती जगविती मनुजता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम
अनुक्रम २०३६६ वि: काव्य
क्रमांक २९६६ नोंद दि ६/२/०५

## वीर चालला

वीर चालला वीर चालला
ज्वालामुखिच्या पोटी शिरण्या वीर चालला
रमणीचा करपाश सोडुनी मुक्त चालला
मुलाफुलांचा हास सोडुनी कोण चालला ?
रस गंधाचा नाच सोडुनी धुंद चालला
प्रेमाचा आवास सोडुनी दंग चालला
असल्याचा हव्यास सोडुनी ध्यास चालला
मानससर अधिवास सोडुनी हंस चालला
इह–सौख्याचा ताज फेकुनी युक्त चालला
वीर चालला वीर चालला

काय नकोसे होते जीवन अपुले त्याला ?
विटला होता परम सुखाला काय त्रासला ?
दुःखापत्ती, झुंज पाहुनी होता भ्याला ?
स्पर्धा हेवा लोभ यातुनी मुक्त जाहला ?
नश्वरतेचे बंध असह्य हे म्हणुनि चालला ?
अमर सुखाचा शोध हवा त्यासाठि निघाला ?
नंदनवनिचा मार्ग काय यासाठी खुलला ?
म्हणुनी हर्षे उत्साहे हा त्वरे चालला ?
वीर चालला वीर चालला

काय निश्चिती यशोदीप वा मिळे दग्धता ?
पर्वा त्याची मुळीच नाही, नाही चिंता !
' सिध्दि करी मग जयघोषांचे निनाद उठती
कीर्तियशाच्या दीव्य दीप्तिच्या ध्वजा फडकती

त्या सिद्धाला ऋध्दिद्भूतिच्या ललना वरती
युगायुगांच्या मुखातुनी अन् 'प्रणाम' उठती '
असली भासित स्वप्ने घेउनि काय निघाला ?
नव्हे जाणतो पुरे मयाच्या मोह-महाला
वीर चालला वीर चालला

अज्ञाताच्या अमरपुरीचे वस्त्र फेडण्या
जिज्ञासेची नशा झोकुनी धुंद चालला
वीर चालला वीर चालला



# ओंडका

मार्गाते सोडून आडोशाला जरा
होता कोणी एक ओंडका म्हातारा
किती पावसाळे कितीक उन्हाळे
खाऊन पाहून पडे तो विव्हळे
एकदा तयाचा बोलला उसासा
स्वताशीच पण मोठ्याने जरासा

'देवा रे मरण केव्हा देशी मज
केधवा करिशी पीडेतून मुक्त
जीर्ण शीर्ण झाले शरीर नि मन
केव्हा तू करिशी कृपा आच्छादन
ताठर निबर कोरडे किडके
जाहले सर्वांग ओंगळ फुटके
पूर्वीचीच होती बेंडे आणि गाठी
ढोलींची पोकळी आणखी ती वाढी
किड्यांनी खादले पोखरले सारे
आंत नि बाहेर झोंबतसे वारे
सरले जीवन उरले शरीर
कुरूप बीभत्स रोगी नि जर्जर !

स्मरती ते दिन आठवे यौवन
जेव्हा देही मनी चैतन्य चैतन्य
सरस सुंदर सारे बाह्यान्तर
नसा नसातुन वाहे रस-धार
दिधला आधार तेधवा सर्वांसी
पोषिले शाखांसी आणिक पानांसी

पाना येई रंग फळा आले रूप
धाडिला रसौघ तयासी अमूप
काळ गेला किती नांदलो ऐसाची
भोगिले यौवन सेवा केली साची

त्यावेळी सन्निधी पक्षी नि प्रवासी
हासले गाइले बैसले छायेशी
आज कुठे परि जीवनाचा हर्ष !
भकास हे क्षण भयाण, उदास
एकाकी मी एथे एकांती निर्जनी
पडे दुर्लक्षित विचारी ना कोणी !
भूत की पिशाच्च समजोनि मला
भिउनिया मुले येती ना बाजूला
चिमणाच कोणी पक्षीही इकडे
फिरके ना गाई बसे नच उडे
पशु ना माणूस प्रेमे मज पाही
हीच कृतज्ञता सद्भाव कोठेही ?
वाटते या क्षणी मरावे तत्काळ
माराया धजेना न ये तोही काळ
असह्य वेदना अपार यातना
केंव्हा संपतील ? भोग हा सरेना !

कापतो न कोणी पेटवी ना मढे
पेटविता धूर भरे चोहिकडे
हाय रे नशिबा मरणे न जिणे
कसली दारुण सजा ही भोगणे !
मरणाच्या दारी उंबरठ्यावरी
तिष्ठत तिष्ठत केंव्हा ती अखेरी !

असेची साहणे उन्हाचे चटके
वारा-पावसाचे सदैव फटके
थंडीचे झोंबणे स्वताची दुर्गंधी
साहत विव्हळे सुटका ती कधी !

तापत तडकत फुटत भाजत
सडत कुजत असेची व्यथित
कोठवरी जिणे प्रश्न एक हाच
उत्तर न मिळे प्रश्न तोच तोच !
तिळाने तिळाने तुटत तुटत
क्षणाने क्षणाने क्षरत क्षरत
कणाने कणाने खरत खरत
बिंदूने बिंदूने गळत गळत
आधींनी व्याधींनी असेची खायचे
असे अशांतीत असेची जायचे

असे कधीतरी असेची जायचे
असेची मरणे ! असे मरायचे ?
देही मरायचे ! मनी मरायचे ! !
असे मरायचे ! ! असे मरायचे ! !



# कृतघ्नता

होता तिष्ठत एकलाच तरु तो त्या माळरानावरी
एकान्ती विजनी विशुद्ध ऋषि की तो साधनेला करी
चंडाशूकर साहिले स्वशिरि अन् पुष्पे फळे अर्पिली
पर्णेही दिधली सुमंगल जना पांथाश्रया सावली

गेलो हिंडत एकदा नवल तो पाही तिथे लोचनी
आगीच्या उठती भयंकर किती त्या वृद्ध वृक्षातुनी
ज्वाला रक्तिम, तत्क्षणीच तरु तो धरणीवरी कोसळे
त्याची ती करुणामयी अवदशा पाहुनि चित्ती सले !

आत्मानंद निमग्न जीविति सुखे काल क्रमे वृक्ष हा
स्वार्थासक्त नरे तयासि वधिले ! सौहार्द हे ! न्याय हा !
वृद्धत्वी असहाय निर्धन असा सद्भाव ज्या अंतरी
त्याच्या जीवनरसा सह-सुखा खंडीत केले परी

वानावी किति रे कृतज्ञ हृदया, कारुण्य सिंधू नरा !
तूझी प्रीति ! तुझ्या विवेक विभवा पाहूनि धाली धरा



# गटार

'गटार ?
गटारच !!
छीः ! ही गटारच आहे !
कशाला ? कशाला आणलंस इथे ? '

हो ही गटारच आहे
घाणीची जलधार !
अशुद्धाची नहर !
दुर्गंध-गर्भाची वार !
जी म्हणतो आम्ही अस्पर्श्य, पण-
स्पर्शल्याशिवाय चालत नाही.
जी अदर्श्य, पण
पाहणे अनिवार्य !
जी दुश्चिन्त्य, पण
चिंतावी लागते ! निरुपायास्तव !
जिचे अस्तित्व नको आहे ? नको आहे !
परंतु,
चिकटले आहे सुटत नाही !
मिटावयाचे पण मिटत नाही !
नाकारायचे पण नाकारता येत नाही !
विसरायचे ?
छे ? विसरताही येत नाही !
नको तिची मूर्त ! नको देह ! नको दर्शन !
नको विचार ! नको अस्तित्वच !

भल्या माणसा, विचारी माणसा,
सहृदय माणसा, हृदयाच्या माणसा,
माणसा, माणसातील मानवा,
थांब !
नको तुला, तरी क्षण थांब !
पहा हिच्याकडे !
पाहिले ? खिळली नजर ?
काय म्हणते ती ?
झपाटलास ना तू ? तिच्या नजरेने !
आता तिचे हृद्गत तूच बोलू लागणार !
बोल, तूच बोल
भिऊ नकोस ! घाबरू नकोस ! अडखळू नकोस !

आश्चर्य !
शुद्धाच्या केंद्रातून निघून
शुद्धाच्याच डोहात ही विलीन पावत आहे !
अशुद्धता हे मधले रूप !
ते अटळ आहे ! अनिवार्य आहे !
त्याचा छेद देता येत नाही !
त्याचा भेद करता येत नाही !
या वैश्विक यंत्राचा
एक स्क्रूच !
ज्याविना ते यंत्रच निकामी !
आणि
हिने धरली आहेत सर्व मोक्याची ठाणी !
महत्वाचे दृष्टि पल्याडचे अंश !
तिला सोडून कोण आहे ?

सर्वत्र तिचा वास !
वाटातून गल्ली बोळातून !
लहान मोठ्या मार्गातून !
राजवैभवी, विलासी रस्त्यातून !
झोपडी बाहेरून, गावातून !
लहान मोठ्या नगरातून ! उपनगरातून !
जातीत धर्मात !
पक्षात, पंथात !
समाजात रांगड्या पांढरपेशा !
आणिक—
मनात ! या महान शक्तिशाली
मानवाच्या मनात !
आणि कदाचित—
या कलात्मक महनीय विश्वाची
सृष्टि रचणाऱ्या त्या ईश्वराच्या
मोडघड करणाऱ्या प्रवृत्तीतही
कदाचित तेथेही—
संभाव्य आहे हिचा वास !

ही गटार !
ही खुली ! ही अर्धावृत !
ही पूर्णावृत ! ही प्रच्छन्न !
ही खळखळणारी ! ही संथ
ही घाण साठवीत कुजविणारी !
सडविणारी ! दुर्गंधीने पछाडणारी !
ही विकृत ! ही अविकृत दिसणारी, भासणारी,
पण विकृतच !

ही अशिक्षितांची !
ही सुशिक्षितांची
ही सभ्यांची
ही असभ्यांची !
ही सरलांची आणि ही कुटिलांची !
ही घाण नेते पण दिसत नाही !
सर्वत्र रांगडेपणाने स्वरूप दाखविते !

परन्तु--
सारखी वाहात आहे ! वाहत आहे !
थांबते पण वाहत आहे !
कारण—हा एक अंश आहे !
तुमच्या आमच्या प्रवाहाचा !
जीवनाचा अस्तित्वाचा !
संस्कृतिचा स्वभावाचा
या अंशाचे अस्तित्व नाकारून—
त्याला कापून छाटून—
त्याला फोडून मोडून—
कुसकरुन ठेचून—
आम्ही जगू शकत नाही !
कारण—
तो आमच्या शरीराचा अवयव नाही !
आमच्या मनाचाच भाग आहे !
मनाच्या प्रवृत्तीतच त्याचे अस्तित्त्व आहे !

ही गटार आहे !
रस्त्याच्या कडेने चालली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानक
२०३६६ दि: ७८५
२२६६ दि: ६।२।८५

विनम्रतेने, सरळपणे, लघुपणे
परंतु—
जोवर—
गटारच रस्ता झाली नाही
तोवर खैर आहे !
अन्यथा—
अन्यथा—??"

# भूदान

धूलीच अल्प याचिली जरी
दिधली न, सले अनुताप उरी-
मुकुट तुझ्या चरणावरि झुकती
महंत तव वर-छत्र इच्छिती
कुबेरही धनभेट दे पदी
रे याचक तू बनलास तरी-

तू समतेचे स्वप्न रेखुनी
लाविलेस सर्वस्व या पणी
यज्ञ मांडिला अपूर्व 'दानी'
करुणेत नमविले मत्त करी-

'पुष्पच ही मज भूमी असली
नसेल तरि चालेल पाकळी'
हात पसरिले 'द्या काहीतरी'
वदलास अचानक मम दारी-

त्या दानाची अल्प धूलिची
पद-सुतेच्या तुलसिदलाची
सुदाम-करिच्या कण पोह्यांची
थोरीव जाणवलि न अंतरी

तपोधना, तव घेउनि तपफल
धरुनि ऋषिवरा करात श्रीफल
आलासी, पसरलीस ओंजळ
परि हंत ! भ्रमलि मति कशी तरी- !

## भारतीय सैनिक

स्वातंत्र्याचे सैनिक आम्ही मातृभूमि निर्धार
अम्ही न बोलू कृती बोलते होउनिया साकार

ज्या मातीचे मातृभूमिने अणु रेणु सृजिले
सत्पुत्रांच्या बलिदानाने अभिषिंचन झाले
रक्त फुलांचा त्यांच्या विरला सुगंध मातीत
मरणीच्या हास्याने जी हो प्रफुल्ल गर्वीत
तीच आमुची आम्ही तीचे
जडले ऐसे अभंग नाते
त्या मातीचा पिंड आमुचा घेई प्राणाकार

पराक्रमाचे मेरुच निर्भयतेचे मांदार
मोडले परी वाकले न जे कधी न लाचार
त्यांच्या स्मृतिच्या एक तरंगे बाहू फुरफुरती
थडथड उडती अन् सळसळती रक्तबिंदु स्फुरती
शत्रुत्वाचा, नच दीनांचा
बलोद्धतांचा, न दुर्बळांचा
माज झाडतो आम्ही करुनी अवश्य तो संहार

असुच्या स्वातंत्र्याचे रक्षण ब्रीद असे असुचे
न्याय्य असे कर्तव्य, तयास्तव मिटून जायाचे
विश्वशांतिची पुकार येता जातो धावूनी
औदार्याच्या कोंदणि शोभे वीरत्वाचा मणी
शिकवावे हे मुळि नलगे
उलटे असुची कृति नेघे
शांतीच्या या गुहेत सांकुश सिंहासहि संचार

राष्ट्रगृहाची सूत्रे जेथे तत्वज्ञा हाती
इतिहासा अज्ञात असे हे राज्य नवे जगती

मर्द मराठा अमुचा नेता सह्याद्री–पुत्र
दिला जयाने कानी अमुच्या रणगाजी मंत्र
लहान दिसतो महान आहे
मृदुतेसह जो वज्रहि वाहे
प्रभुने अमुच्यासाठी धरिला–तो वामन अवतार

पीतान्धांच्या मदोद्धतांच्या फडा ठेचण्यासी
धर्मांधांचे परभृतांचे निर्बिज करण्यासी
सळसळते लखलखते पाते अमुच्या हृदयाचे
अस्त्रसंघ फुरफुरती उत्सुक देही अणुअणुचे
रामबाण अन् कृष्ण चक्र ते
देणे एकच घाव ठाउके
ठोसा खाई शत्रु एक तो पुनश्च ना येणार

द्विजिह्व-बलिचे साह्य मिळू द्या कुणास साचार
कुणा असू द्या दल संख्या–शस्त्रास्त्र अहंकार
अम्ही पुढारू शत्रुस रेटू अमुच्या सीमेपार
सत्यमेव जय पूर्ण जाणतो अभंग सत्त्वी सार
अमुचे वीर्यच अमुची शस्त्रे
अमुचे साहस अमुची अस्त्रे
मातृभूमिचे प्रेम, ढाल ही अभेद्य वज्राधार

स्वत्व संकटी येता जेव्हा युद्धकुंड पेटे
चाळिस कोटिंचे बळ अमुच्या बाहूमधुनि फुटे
बंधूंच्या एकत्व प्रीतिचा दुंदुभि ध्वनि नादे
युद्धाचा झणि कैफ चढे अन् रिपुहस्ती भागे
अल्ला हो अकबर कि पुकार
हरहर महादेव हुंकार
करीत मानव म्हणुनी लढतो दैत्यांचा संहार

# एक स्पर्श

आताच
क्षणी याच, याच क्षणी
काय झाले? नवल झाले!

मन झाले फूल
सडक झाली हिरवी
सायकल झाली स्वप्न
पोकळी झाली अमृत
वारा झाला गंध
शाळा झाली बाग
मुले झालीत डोळे
स्नेहल आणि बोलके
करिती कुजबूज
बोलती गूज

सूर झाले गोडी
मन खेळले फुगडी
काय झाले? कसे झाले?
कोण आले? कोण गेले?
दडून बसले आत आत
कुठेतरि एक गुपित,
मधुकण असले अविट
जपत आहे मनाच्या कोशात

# अश्रू

अश्रू म्हणजे हृदयसरातिल नाजुक भावांचे पाणी
करुणा कादंबिनीच तप्त शांतवि या जलधारांनी

हर्ष सुखाच्या पेल्यामधल्या पेयावर बुडबुडाच हा
हृदी खुपसल्या शूलाग्रीचा रक्तबिंदु लोचनी पहा

अश्रू म्हणजे मानव्याची सीमा अक्षय अमर अशी
मर्त्य नराच्या सहृदयतेची तरल खूण हो व्यक्त जशी

अश्रू असुच्या सर्वासंगे अश्रूविण का कोणि असे ?
अश्रूविण जो, पाषाणचि तो, किंवा मुक्तच सत्य असे

उमळे तरळे झरे ओघळे घेउनि अमुची दुर्बलता
संत दीन वा धीर निर्दयी सर्वाश्रूंची एक व्यथा !

वत्सलता कारुण्य प्रीतिने वक्षि दाटला स्तन कुम्भ
अश्रू ? छे हा अबला-उरिचा स्निग्ध उसळला पय थेंब

क्रौर्याचे वज्रासम पर्वत तेहि वितळती अश्रूंनी
नवलपूर्ण हे प्रभुने केले तेजाचे भेदक पाणी !

मानवता पुष्पाचा गंधच अश्रू सर्वांतरि विहरे
मानवतेच्या सौभाग्याचे भूषण कुंकुम हेच खरे !



# हा मानव

आळसलेली संथ गटार
जांभयात किति अंग मोडते
दुर्गंधीच्या डोळ्यांनी अन्
इकडे तिकडे पहात पडते

उंच हवेली डांबर रस्ता
तिचे विसरुनी असलेपण अन्
रोमान्साचा सभ्यपणाचा
परस्पराला डोळा घालिति

साथीला ही चार खुराडी
तुटकी फुटकी टेढी मेढी
बसके गाल न् पिचली हाडे
घेउनि बसली येथ सभोती

गप्पा मारित भांडत तंडत
अचकट विचकट काही बोलत
पोसत त्यांना दुर्गंधीने
रेलुनि बसते वाफा सोडित

सर्व खुराडी येथ उकिरडी
घाण वेचिति कुत्रि कोंबडी
खुराड्यातले कोण निवासी ?
परस्परांना कोण झोंबती ?

वळवळणे, सरपटणे, खाणे
इथेच निजणे मैथुन त्यांचे !
कोण एथले रहिवासी हे
कोण ? किडे का ? नव्हे ! माणसे !

# तो मानव

आकाशाच्या उंच महाला
स्वर्णकळस ताऱ्यांचे लसती
विजेरि झुंबर चंद्रदिव्यांचे
रत्न रेखिल्या छता लचकती

20366 काव्य
2269

येथे गाली सुंदरतेच्या
अखंड मादक यौवन लाली
चुंबिति वीणाधर-रस-किंकिणि
सुरात स्रवते नूपुरावली

पेयामृत-माधुरीत बुडती
अधरांच्या नित रंगशलाका
नयनी गाली अलकी भाली
इथे रंगविति रक्तिमरेखा

नंदन-कानी इथे करितसे
विलास नटुनी थटुनी हितगुज
गगनयान बाहेरी उत्सुक
घ्याया अपुल्या उरी चरण रज

मानस येथे स्वताच ल्याले
भोग सुंदरांचे अवगुंटन
भरून उरला भोगच सारा
भोग घडा अन् भोगच जीवन

महालि या सेविती अहर्निश
अक्षय असले असीम वैभव
कोण येथ हा कोण निवासी
इंद्र काय हा ? छे ? हा मानव

# मी अशरण थांब तिथे मरणा

उंबऱ्यात ठेवि न तव चरणा
मी अशरण थांब तिथे मरणा

ऐकू ये जरि कुक्कुट आरव
तम भेदिति जरि काकांचे रव
अवेळ ही, नच ऐकवि दिनरव
अजुनी न ज्ञानरवि ये गगना

अता कुठे रंगि रंग भरला
डाव खेळुनी अर्धा झाला
सारिपाट मांडला रंगला
अजुनी न भोगरसि तृप्ति मना

अजूनी कसे रे तव आवाहन ?
अजुनी कळे नच मजला 'मी' पण
तुझे न जाणे स्वरूप दुर्गम
कळले न जायचे स्थलि कवणा

अजुनि रात्रिचा सुरंग लुटणे
ज्ञेय शोधणे, तदर्थ भ्रमणे
धडपडणे, तळमळणे, जगणे
तमि अगम पथी धरिता न तमा

अविश्रांत श्रमि थकेल तनुमन
कळेल अंती कार्य नि कारण
ज्ञानकरी होइल दिन दर्शन
वा होवो नच, येइन मरणा

रे थांब उंबऱ्यावरीच येथुन
जाणे विन्मुख, तुजला धाडिन
ऐक आज नच तुझे अनुसरण
मी सज्ज न अजुनी आगमन'

अजुनि रसरसे इथे आत्मबल
भीष्माचे बघ इथे मनोबल
अजुनि चळी या होणे निश्चळ
रे परत, प्रबळ जीवितेपणा

REFBK-0020366
REFBK-0020366